# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ३१/०५/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

आज दिनांक ३१ में, २०२३ रोजी उल्हासनगर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभाग मार्फत राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत शासनाकडून प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार दिनांक ३१ में, २०२३ रोजी जागतिक तंबाखु विरोधी दिन उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय येथे साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. वैशाली नाईक यांनी सादर केली. सदर कार्यक्रमात श्री. अजीज शेख मा. प्रशासक तथा आयुक्त, डॉ. करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त (सेवा), श्री. अशोक नाईकवाडे उप आयुक्त (मुख्यालय), डॉ. मोहिनी धर्मा, वैद्यकीय आरोग्य अधिकारी व इतर विभाग प्रमुख हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमामध्ये तंबाखु मुक्ती संदर्भात उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी शपत घेतली. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने डॉ. किर्ती किलजे यांनी प्रेझेंटेशन सादर करुन सर्व अधिकारी व कर्मचारी यांना जागतिक तंबाखु विरोधी दिनाचे महत्व व सदर दिनांचे घोषवाक्य "We Need Food, Not Tabacco" समजावुन सांगितले व तंबाखूचे सेवन बंद करण्याचे आवाहन करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने दिनांक ३०/०५/२०२३ रोजी उल्हासनगरस महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये धडक मोहिमचे आयोजन करण्यात आले होते. सदर जागतिक तंबाखु विरोधी दिनाच्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय येथे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे "Oral Health Checkup" शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

तसेच डॉ विद्या चव्हाण, शहर कार्यक्रम व्यवस्थापक यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची समाप्ती केली.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.